# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक रानिआ. १०९७/३०९१/९७/पंरा,
नवीन प्रशासन भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०३२.
दिनांक १६ ऑक्टोबर १९९७.

## परिपत्रक

विषय.—**ग्रामपंचायत निवडणुका—१९९७.**
प्रभाग रचना प्रस्तावावर न्यायालयात/विभागीय आयुक्तांकडे
दाखल झालेल्या दाव्यांबाबत.......

भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २४३ के मधील तरतुदीनुसार राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र गठित झाला असून राज्य निवडणूक आयुक्त यांची नेमणूक दिनांक २६ एप्रिल १९९४ रोजी करण्यात आलेली आहे. या संविधानाच्या तरतुदीनुसार राज्यातील पंचायती म्हणजेच जिल्हा परिषदा व पंचायत समिती तसेच ग्रामपंचायतीच्या निवडणुका घेण्याची संविधानात्मक जबाबदारी राज्य निवडणूक आयोगाची आहे.

२. मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ मधील कलम १०-ए नुसार राज्य निवडणूक आयोगाने ग्रामपंचायतीच्या निवडणुकीसाठी प्रभाग रचना, मतदार याद्या आणि निवडणुका घेणे याबाबत अधिक्षण, निर्देशन व नियंत्रण करावयाचे आहे. राज्य निवडणूक आयोग याबाबत आदेशाद्वारे त्यांच्या शक्ती प्रदान करेल त्या अधिकाऱ्याने राज्य निवडणूक आयोगाचे कामकाज पहावयाचे आहे. निवडणुकीच्या कामासाठी आवश्यक असलेला कर्मचारीवृंद हा राज्य शासनाने राज्य निवडणूक आयोगाला उपलब्ध करून द्यावयाचा आहे आणि हा कर्मचारी राज्य निवडणूक आयोगाच्या नियंत्रणाखाली काम करेल.

३. खुल्या व निर्भय वातावरणामध्ये निवडणुका पार पाडण्यासाठी प्रचलित कायद्यामधील त्रुटी दुरुस्त्याबाबत आवश्यक ते बदल, विशेष किंवा सर्वसाधारण आदेश किंवा निदेश राज्य निवडणूक आयोगास पारित करण्याचे अधिकार संविधानातील अनुच्छेद २४३-के अन्वये तर आहेतच पण तसे अधिकार संबंधित कायद्यातील तरतुदीनुसार सुद्धा प्राप्त झाले आहेत.

४. वर उल्लेख केलेल्या तरतुदी ह्या संविधानात्मक दर्जाच्या असून, राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांना संविधानात्मक दर्जा प्राप्त झालेला आहे व राज्य निवडणूक आयोग व आयुक्त यांना संविधानात्मक दर्जा प्राप्त असून, त्यांचे कार्यालय स्वायत्त आहे. **यामुळे मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ मधील कलम १५४ मधील तरतुदीनुसार राज्य शासन, विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकारी यांना संविधानात्मक रीत्या होणाऱ्या निवडणुकीच्या बाबींसंबंधी नियंत्रण ठेवण्याचे अधिकार प्राप्त होत नाहीत.** राज्य निवडणूक आयोगाने स्वच्छ व निर्भय वातावरणात निवडणुका पार पाडण्यासाठी मतदार प्रभाग रचना, मतदार याद्या आणि निवडणुका घेण्याच्या प्रक्रियेबाबत संविधानाच्या २४३-ओ अनुच्छेदानुसार उच्च न्यायालयालादेखील दखल घेण्यास बंदी घालण्यात आलेली आहे व कोणतीहि निवडणूक ही संबंधित कायद्यातील तरतुदीनुसार निवडणूक प्रक्रीया संपल्यानंतर फक्त निवडणूक याचिका दाखल करूनच आव्हानित करता येईल अशी संविधानात्मक तरतूद करण्यात आली आहे.

५. राज्य निवडणूक आयोगाने निर्भय व शांत खुल्या वातावरणामध्ये निवडणुका घेत असताना संबंधित व्यक्तीला निवडणुकीच्या वैधतेबाबत निवडणूक याचिका दिवाणी न्यायालयामध्ये दाखल करण्याबाबत मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ चे कलम १५ नुसार तरतूद करण्यात आलेली आहे. तथापि निवडणूक प्रक्रियेबाबत या तरतुदीव्यतिरिक्त इतरत्र कोठेही

निवडणुकीच्या अनुषंगाने नियंत्रण करण्याचे अधिकार कोणत्याही कायद्यान्वये कोणत्याही शासकीय अधिकाऱ्याला प्रदान करण्यात आलेले नाहीत. निवडणूक याचिकेव्यतिरिक्त निवडणुकींच्या अनुषंगाने कोणत्याही शासकीय अधिकाऱ्याला प्रदान करण्यात आलेले नाहीत. निवडणूक याचिकेव्यतिरिक्त निवडणुकींच्या अनुषंगाने कोणत्याही शासकीय यंत्रणेमार्फत नियंत्रण न ठेवण्याबाबतची दक्षता कृपया घ्यावी.

राज्य निवडणूक आयुक्तांच्या आदेशानुसार.

**(अपर्णा जोशी)**
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग.

प्रति

सर्व जिल्हाधिकारी,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्वमंत्रालयीन विभाग.